विद्या विकास मंडळाचे,

# सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री, जि. धुळे ४२४३०४ (महाराष्ट्र राज्य)

## आंतर विभागीय कबड्डी (पुरुष व महिला) स्पर्धा २०१८-१९

दिनांक :- १६ ऑक्टोंबर २०१८

दिनांक १५ व १६ ऑक्टोंबर २०१८ रोजी महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रिडा विभागाद्वारे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत आंतर विभागीय कबड्डी (पुरुष व महिला) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेचे उद्घाटन विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष मा. भैय्यासाहेब चंद्रजीत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे वरिष्ठ क्रीडा संचालक डॉ. विजय पाटील, महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. हसिनखॉ तडवी यांच्यासह धुळे, जळगाव, नंदुरबार, एरंडोल विभागाचे संघ प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक व खेळाडू उपस्थित होते. सदर स्पर्धा प्रकाशझोतात व मॅटवर खेळविण्यात आल्या.

स्पर्धेसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत धुळे, जळगाव, नंदुरबार, एरंडोल विभागाचे संघ सहभागी झाले होते. त्यात एकूण ४८ पुरुष व ४८ महिला विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

**कबड्डी (पुरुष व महिला) स्पर्धेचा निकाल :-**

| | | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| **विजयी** | :- | एरंडोल विभाग | धुळे विभाग |
| **उपविजयी** | :- | धुळे विभाग | नंदुरबार विभाग |

16/10/2018.

प्रा. हसिनखॉ तडवी
Director of Physical Education,
V.V.M's. S.G. Patil College,
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

डॉ. आर. आर. अहिरे
Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College SAKRI, Dist.Dhule

# आंतर विभागीय कबड्डी (पुरुष व महिला) स्पर्धा क्षणचित्रे



आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करतांना विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष मा. भैय्यासाहेब चंद्रजीत पाटील



आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील



आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे वरिष्ठ व नावापुर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. विजय पाटील



आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष मा. भैय्यासाहेब चंद्रजीत पाटील

**Principal**
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

स्पर्धेदरम्यानची काही क्षणचित्रे














Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College,
SAKRI, Dist.Dhule













Principal
V.V.M.s S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College
SAKRI, Dist.Dhule

# वृत्तांकन

## क्रीडा स्पर्धेत जय-पराजयापेक्षा सहभाग नोंदवण्यास मोठे महत्त्व : पाटील



---

**पुण्य नगरी** | शनिवार,२० ऑक्टोबर २०१८ | धुळे



## साक्री येथे आंतरविभागीय कबड्डी स्पर्धा

साक्री : येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत महिला व पुरुष आंतरविभागीय प्रकाशझोतात होणाऱ्या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन विद्याविकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, प्रमुख पाहुणे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. दिनेश पाटील, ज्येष्ठ क्रीडा संचालक डॉ. विजय पाटील, डॉ. भालचंद्र मोरे, प्रा. एस.वाय. चव्हाण, एन मुक्टोचे अध्यक्ष प्रा. संजय सोनवणे, उपप्राचार्य अनंत पाटील, निवड समिती सदस्य प्रा. सतीश कोमटा, प्रा. राजेंद्र अग्रवाल, भाजपचे तालुकाध्यक्ष संजय अहिरराव, माजी जिल्हा उपाध्यक्ष बापू गीते, सरचिटणीस राजेंद्र खैरनार, मालपूरचे माजी सरपंच नयनेश भामरे, क्रीडा संकुल समिती अध्यक्ष संजय भामरे, धनंजय सोनवणे उपस्थित होते.

चंद्रजीत पाटील म्हणाले, जागतिकस्तरावर भारत देश क्रीडाक्षेत्रात चांगली कामगिरी करत असून पुढे येणारा काळ हा क्रीडा वीरांचा असेल. त्यामुळे प्रत्येक खेळाडूने सातत्य, चिकाटी व परिश्रमाच्या बळावर क्रीडाक्षेत्रात आपले नैपुण्य दाखवून चमकदार कामगिरी करावी, असे सांगितले. प्रा दिनेश पाटील, प्राचार्य आर. आर. अहिरे यांनी मार्गदर्शन केले.

सी.गो.पाटील महाविद्यालयात प्रकाश झोतात व मॅटवर खेळल्या गेलेल्या कबड्डी स्पर्धेत धुळे, नंदुरबार, जळगाव व एरंडोल येथील महिला संघ व पुरुषांनी सहभाग घेतला. जळगाव येथील महिला व पुरुषांचा संघ विजयी झाला. धुळे येथील दोन्ही संघ उपविजयी ठरले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून धुळे क्रीडा कबड्डी असोसिएशनचे देवकर गवळी, अकिल शेख, जितेंद्र ठाकरे, दिलीप साळुंके, ललित सोनवणे, कुणाल चौधरी आदींनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा.डॉ.विजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.पी. एस. साळुंके यांनी केले. आभार प्रा. डॉ. भालचंद्र मोरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्य आर. आर. अहिरे, उपप्राचार्य अनंत पाटील, प्रा. संजय सोनवणे, क्रीडा संचालक हसीनखाँ तडवी आदींनी परिश्रम घेतले.

---

**सकाळ** जळगाव, सोमवार, २२ ऑक्टोबर २०१८



साक्री : विद्यापीठस्तरीय कबड्डी स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी चंद्रजित पाटील, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरेंसह मान्यवर.

## जळगावचा मुला-मुलींचा संघ विजेता

### साक्रीत विद्यापीठस्तरीय कबड्डी स्पर्धा; धुळ्याला उपविजेतेपद

**म्हसदी, ता. २१ :** साक्री येथील सी. गो. पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय कबड्डी स्पर्धा झाल्या. स्पर्धेत जळगाव येथील मुला-मुलींचा संघ विजेता, तर धुळे येथील मुला-मुलींचा संघ उपविजेता ठरला.

साक्रीचे विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजित सुरेश पाटील यांच्या हस्ते उदघाटन झाले. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे अध्यक्षस्थानी होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, अधिसभा सदस्य डॉ. संजय सोनवणे, भाजपचे तालुकाध्यक्ष संजय अहिरराव, विद्यापीठ निवड समिती सदस्य प्रा. सतीश कोकता, डॉ.भालचंद्र मोरे, उपप्राचार्य प्रा. अनंत पाटील, प्रा. के. जी. वाघ, मालपूरचे माजी सरपंच नयनेश भामरे, नवापूरचे क्रीडासांचालक डॉ. विजय पाटील आदी उपस्थित होते.

जळगाव, एरंडोल, धुळे व नंदुरबार विभागातील मुला-मुलींचे संघ सहभागी झाले. प्रथमच 'उमवि'ने मॅटवर स्पर्धा घेतल्या. सर्व सामने प्रकाशझोतात झाले. नवापूरचे क्रीडा सचालक डॉ. विजय पाटील, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य अनंत पाटील, डॉ. भालचंद्र मोरे, क्रीडा हसन तडवी याच्या उपस्थितीत समारोप झाला. डॉ. प्रकाश साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. भालचंद्र मोरे यांनी आभार मानले.

---

**आपला महाराष्ट्र** सोमवार २२ ऑक्टोबर २०१८

## सी.गो.पाटील महाविद्यालयात आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन



---

**लोकमत**

धुळे संघ दुसऱ्या स्थानावर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा

## कबड्डी स्पर्धेत जळगावचे वर्चस्व

### विद्यापीठ संघात होणार निवड

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.